International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.1 Sept – Oct 2022

# बखर वाङमयातुन प्रतिबिंबित होणारे छत्रपती संभाजी महाराज : एक अभ्यास

संदीप शिवाजी शिंदे
संशोधक विद्यार्थी इतिहास विभाग, संशोधन केंद्र, ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी
*Corresponding Author-* संदीप शिवाजी शिंदे
Email id: dr.sandipshinde2@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7266770

प्रस्तावना :

मराठा इतिहासाच्या लेखना मध्ये बखर वाङमयाचे महत्व अनन्य साधाराण आहे. बखर वाङमय हा मराठी साहित्याचा विषय असला तरी मराठा इतिहासलेखना मध्ये बखर वाङमय महत्वपूर्ण ठरते. बखर वाङमय मराठा इतिहासात समकालीन आहे. त्यामुळे बखर वाङमयात इतिहासाचा अंश मोठया प्रमाणात आढळून येतो. शिवाजी महाराजांच्या समकालीन असलेला कृष्णाजी अनंत सभासदाने 'सभासद बखर ' लिहली. उत्तर काळात मल्हार रामराव चिटणीस यांनी 'चिटणीस बखर' किंवा 'सप्तप्रकरणात्मक बखर' लिहली. शिव दिग्विजय बखर, एक्याण्व कलमी बखर इ. बखरी मराठा इतिहासाच्या दृष्टिकोणतून महत्वपूर्ण आहेत. या बखरीमध्ये मराठा इतिहासाचे वर्णन आलेले आहे. यात मराठा इतिहासा बरोबर छत्रपती संभाजी महाराजवर लीखान करण्यात आले आहे. म्हणून छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवन चरित्रा वरील ऐतिहासीक लीखानाचा अभ्यास करते वेळी बखर वाङमयचा अभ्यास करणे आवश्यक आहे. सुरुवातीच्या मराठा इतिहास कारांनी बखर वाङमयाला आधार घेऊन छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवन चरित्राची माडणी केली. यामुळे ऐतिहासिक अंशा बरोबर अनऐतिहासिक गोष्टी संभाजी महाराजाच्या चरित्राशी जोडल्या आहेत. या बखर वाङमयातुन छत्रपती संभाजी महाराजांची प्रतिमा कशी रेखाटली गेली. याचा अभ्यास होणे आवश्यक होते. प्रस्तुत शोध निबंधा मध्ये बखर वाङमयातुन प्रतिबिंबित झालेल्या छत्रपती संभाजी महाराजांचा आढावा घेतला आहे.

गृहीते

१ बखर वाङमयात मराठा इतिहासाची वर्णणात्मक माहिती आहे.

२ बखर कारांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवना विषयी लिखान केले आहे.

३ बखर वाडयमयातील छत्रपती संभाजी महाराजांच्या ऐतिहासिकता सदिंग्ध किंवा शंकास्पद आहे.

विषय विवेचन :

मराठा इतिहासावर अनेक इतिहासकारांनी लेखन केले आहे. हे लिखन करता असतांना इतिहासकारांनी वेगवेगळया इतिहास साधनांचा वापर केला आहे. मराठी इतिहासकारांनी मराठा इतिहासाचे लेखन करतेवेळी बखर वाङमयाचा मोठा आधार घेतला आहे. काही बखरीचे बखरकार समकालीन असले तरी बखरी मधील वर्णनानुसार बखर वाङमयाचे लिखान संधिग्ध वाटते. कृष्णाजी अनंत सभासद शिवाजी महाराज व राजाराम महाराज यांच्या दरबारा मध्ये वास्तव्य केलेला लेखक आहे. मल्हार रामराव चिटणीस हा उत्तर कालीन लेखक आहे. तरी पण इतर साधना मध्ये सापडत नसलेले अनेक आरोप चिटणीसाने छत्रपती संभाजी महाराजावर केले.

कृष्णाजी अनंत सभासद हा शिवाजी महाराजाच्या समकालीन लेखक आहे. याने सभासद बखर लीहली त्या नंतरच्या काळात छत्रपती राजाराम महाराजांच्या दरबारात दरबारी लेखक होता. हा सभासद बखरी मध्ये छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती राजराम महाराजा बददल गौरव उदगार काढतो. पण छत्रपती संभाजी महाराजाबददल पूर्वग्रह दुषीत पणे आरोप करतो. 'लेकरा मजला साडू नको. औरंगजेबाचा आपला दावा तुजला दगा करावयाचा होता परंतु, श्रीने कृपा करुन साडून अणीला थोर कार्य जाले' [१]. अशा प्रकारचा उल्लेख सभासद बखरी मध्ये येतो. हा सर्वांत छत्रपती संभाजी महाराज

Co-ordinator

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya

दिलेर खानाकडून वापस स्वराज्यात आल्या नंतर संभाजी महाराजा व शिवाजी महाराज यांच्या मध्ये झाला. हा संवाद होते वेळी सभासद उपस्थित होता की नाही हा प्रश्न आहे. पण सभासदांनी हा सवांद शिवाजी महाराज यांच्या मुखातुन वदविला आहे. असे अनेक संवाद सभासदाने शिवाजी महाराज यांच्या मुखातुन वदविले आहेत. 'आता कारकुनामध्ये माझे वेळेचे कारकुन यांस तो संभाजी वाचुं देणार नाही. त्यांपैकी एक प्रल्हादपंत निराजीपंताचे पुत्र व रामचंद्रपंत निळोपंताचे पुत्र, हे दोघे ब्राम्हण पराक्रमी होतील. निळोपंत प्रधानाचा पुत्र हारि नाव धरील. या वेगळे कोणी होणार होतील. मराठयामुध्ये बहूतेक संभाजी राज्य माडील. उरल्यापैकी संभाजी घोरपडे व बहिर्जी घोरपडे व धनाजी जाधव हे जरी वाचले हे तिघे मोठे पराक्रम करतील. मोडील राज्य हे तिघे मराठे सावंरतील असे बोलले'[२] सभासदानी हे उदगार शिवाजी महाराजांच्या मुखातुन वदविले आहेत. शिवाजी महाराजांच्या मृत्यु नंतर घडलेला इतिहास भविष्य काळामध्ये सांगुन करतील होतील असे भविष्य वाचक शब्द टाकून सांगीतले आहे. म्हणजेच शिवाजी महाराजांनी असे उदगार काढले नाही तर सभासदाने आपल्या बखरी मध्ये हवे तसे उदगार रेखाटले आहेत. संभाजी महाराज मराठयांचे राज्य मोडतील. कारकुन मंत्रीमंडळाला वाचु देणार नाही. असे विनाकारण आरोप करतो. मुळांत संभाजी महाराजानी ज्यांनी गुन्हा केला त्यांनाच शिक्षा केली. मराठयांचे राज्य वाढविण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

या आरोपाचे खंडण करेतेवेळी अ.रा. कुलकर्णी म्हणतात 'आपल्या पुत्रा विषयी बाप इतके कटु उदगार काढील असे वाटत नाही. कारण आपण कष्ठाने मिळवलेली राज्य संभाजी राजा आपल्या दुर्गुणांनी बुडवेल ही महाराजांची खंत इतिहासाने पूसून काढली होती.'

मल्हार रामरावाच्या बखरीची चिकित्सा करण्यापुर्वी एक बाब लक्षात घेतली पाहीजे की, ही बखर संभाजीराजे यांच्या मृत्यु नंतर तब्बल १२२ वर्षांनी लिहली गेली आहे. सभासद आणि मल्हार या दोन्ही बखरकाराचे संभाजी राजेच्या संबधीचे बरेच लिखान विपर्यस्त व कल्पित आहे. पण त्याची कारणे भिन्न आहेत. मल्हार रामरावाचे लिखान पूर्वग्रहदूषित दष्टिकोनातुन केले आहे .याचे कारण असे आहे की, मल्हार रामरावाचा खापर पणजोबा बाळाजी आवजी चिटणीस यास संभाजीराजेनी हत्तीच्या पायी दऊन ठार मारले. याच घटनेचा राग म्हणून चिटणीसाने संभाजीराजे यांचे पुर्वग्रहदुषीत लिखान केल आहे. तर दुसरीकडे बाळाजी आवजी, खंडो बल्लाळ या पुर्वजाविषयी अतिशय चांगले लिहून त्यांचे नाव लौकिक करण्याचा प्रयत्न केला. तसेच संभाजी राजे गादीवर येऊ नयेत म्हणून केल्या गेलेल्या विषयप्रयोबगाच्या कटात आणि काहि सहभाग होता. हे तो कोठेच नमुद करत नाही. उलट शिवाजी महाराज संभाजी महाराज आणि राजाराम महाराज या ती राज्य क्रर्त्यावर लिहलेल्या बखरीत चिटणीस घराण्यातील व्यंक्तीनी कशी एकनिष्ठा व मोठी कर्तगारी दाखवली यांचीच प्रत्यही उदाहराणे देत राहतो. संभाजी महाराजाबददल चिटणीस म्हणतो, ' वडील पुत्र वये करुन योग्य, परंतु क्रुर आणि व्यसनी, तेव्हा पुढील विचार यथा स्थितीत दिसत नाही'[३] शिवाजी महाराजांचा वडील मुलगा राज्यकारभार चालविण्यासाठी वयाने योग्य आहे. पण तो क्रूर व व्यसनी असल्यामुळे राज्याचे भविष्य व्यवस्थीत दिसत नाही. अशा प्रकाराचा आरोप चिटणीस करतो. पण संभाजी महाराज क्रूर होते. असा उल्लेख इतर साधना मध्ये दिसत नाही. राज्य कारभार चालविण्या वरुन संभाजी महाराज क्रुर व व्यवस्नी होते. हे सिध्द होत नाही. तसे समकालीन पुरावे सापडत नाहीत. मराठी बखकरकारांनी मराठी माणसाबरोबर दुराचारी व दुर्वतनी संभाजी महाराजांचे चित्र निर्माण केले. वा.सी. बेंद्रयांनी बखरकारांचे वाभाडे काढताना म्हणठले आहे की, 'बखरकारांची ही कथाख्यनी थाटाची पौराणीक लेखन पध्दती व इतिहासशास्त्रांचे तत्कालीन गाढ अज्ञान हीच मुख्यता या विपर्यस्त विचारसरणीत कारणीभुत झालेली आहेत. बखरीच्या लेखनकला समयीच्या वर्णाश्रमधर्मपध्दतीतील विचार आचारातील वैगुन्यही बखरीच्या पूर्वग्रहदूषित व विशिष्ट वळलास जबाबदार आहे'[४]. मराठी बखर वाङमय पूर्वग्रहदूष्टतपणे लिहले गेले आहे. शिवदिग्विजय बखरी मध्ये संभाजी महाराजांचे शिक्षणाच्या उल्लेख असा येतो की, 'जेष्ठ पुत्राची चाल चांगली नाही म्हणून शिक्षागार ठेवले'[५] या बखरांनी संभाजी

संदीप शिवाजी शिंदे

Co-ordinator IQAC

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Estd. 1983

PRINCIPAL Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Dist.Parbhani

महाराजाचे भविष्य अभिन्न जाणले होते. संभाजी महाराजांची चाल किंवा वव्रवणुक चांगली नाही म्हणून शिक्षणाची व्यवस्था केली. असे शिवदिग्विजयकार म्हणतो. या वरुन संभाजी महाराजा विषयी बखरकायांचे मत किती कलुशित होते. हे लक्षात येते. बखरकांरांनी पूर्वग्रह दुषित पणे संभाजी महाराजांचे चरित्र मांडले आहे. ही बाब निदर्शनास येते. यामुळे बखर वाङमय पूर्वग्रह दुषीत व शंकास्पद आहे हे सिध्द होते. म्हणून छत्रपती संभाजी महाराजाचे चरित्र लिहते वेळी अंतिरजीत, वर्णत्मक, कल्पीत बखरीचा संदर्भ म्हणून वापर करणे जोखमींचे ठरते.

### निष्कर्ष

बखर वाङम पौराणीक वर्णनात्मक आहे. कल्पित संवाद मोठया प्रमाणात आहेत. सभासद बखर व चिटणीस बखरीमध्ये छत्रपती संभाजी महाराजा विषयी मोठया प्रमणात लिखान केले आहे. हे लिखान वर्णनाताक आणि कल्पीत आहे. बखर वाङमयात कल्पिन संवाद मोठया प्रमाणात आहेत. या कल्पिताच्या आधारे बखरकार छत्रपती संभाजी महाराजावर क्रुर व दुर्वतणाचा आरोप करतात. ते आरोप समकालीन साधनाचा आधारे सिध्द होत नाहीत. म्हणून बखर वाङमयातील लीखान शंकास्पद व सदिग्ध असलयाचे सिध्द होते. छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवना विषयी बखर वाङमयातुन माहीती मिळते. पण त्या कल्पित माहीतीवर इतिहासकारांनी किती विश्वास ठेऊन संभाजी महाराजांच्या जीवन चरित्राचे लिखान करणे योग्य ठरणार नाही. छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवन चरित्राचे लिखान करतेवेळी बखर वाङमयावर विसंबुन न राहता समकालीन कागदपत्राची पडताळणी करणे आवश्यक आहे.

### संदर्भ


१ सभासद कृष्णाजी अंनत – विरचित सभासद बखर संपा : शं. ना. जोशी, पुणे. १९६० पृ. क्र १३

२ सभासद कृष्णाजी अंनत – विरचित सभासद बखर संपा : शं. ना. जोशी, पुणे. १९६० पृ. क्र १०६–१०७

३ चिटणीस मल्हार रामराव विरचित शककर्ते श्री शिव छत्रपती महाराज यांचे सप्तपृकरणात्मक चरित्र , संपादन र.वि. हेरवाडकर पुणे १९६७ पृ क्र २३७

४ बेंद्रे. वा.सि. श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे चिकित्सक चरित्र, दूितीय आव्रती १९७१ मुंबई पृ. क्र १

५ नंदुरवारकर पा. रा. दांडेकर ल. का. संपादक श्री शिवदिग्विजय श्री शिवाजी महाराजांची बखर श्री पुरातनेतिहास प्रकाशन मंडळाची ग्रंथमाला बडोदा ग्रेथे फतेसिंह छ. छा. १९९५ पृ. क्र २४३


PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

संदीप शिवाजी शिंदे